**राजीव गांधी पंचायत राज अभियाना अंतर्गत ग्रा.पं.कार्यालयाच्या नवीन इमारत <u>बांधकामासाठी सुधारीत आराखडा .</u>**
**मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**

## शासन निर्णय क्रमांकः ग्रापंई-२०१३/प्र.क्र.१८९/पंरा-७

मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: ३० जानेवारी,२०१४

<u>वाचा</u> :-

1. **शासन निर्णय,ग्रा.वि.व ज.सं.वि. क्र.पंविम-२००७/प्र.क्र.७६६/यो-७, दि. ८.८.२००७**
2. **शासन परिपत्रक ग्रा.वि.व ज.सं.वि.,क्र.ग्रापंई-२०११/प्र.क्र.११६/पंरा-७, दि. १९.७.२०११**
3. **शासन निर्णय,ग्रा.वि.व ज.सं.वि. क्र.ग्रापंई-२०११/प्र.क्र.१/पंरा-७, दि.२०.४.२०१२**

**<u>प्रस्तावना</u> :-**

१. राज्यातील पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी तसेच केंद्रशासनाच्या ई-पंचायत योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याद्दष्टीने तसेच ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या आराखड्यामध्ये तलाठी, कृषी सहायक व ग्रामीण स्तरावरील अन्य शासकीय कर्मचारी यांना ग्रामपंचायत कार्यालयामध्ये बसण्यासाठी जागा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, हाती घेण्यात येणाऱ्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी संदर्भीय दिनांक २०.४.२०१२ च्या शासन निर्णयान्वये नमुना आराखडा विहीत करण्यात आलेला आहे. दरम्यानच्या कालावधीत, राजीव गांधी पंचायत सक्षमीकरण अभियाना अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालयाच्या आराखड्यामध्ये जनसुविधा केंद्राचा समावेश करुन सुधारीत आराखडा निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

२. राजीव गांधी पंचायत सक्षमीकरण अभियानाअंतर्गत ग्रामपंचायत कार्यालयाच्या आराखड्या मध्ये जनसुविधा केंद्राचा समावेश करुन मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम, मुंबई यांच्याकडील नमुना आराखडा क्र.एडीएम/५५२६, नकाशा क्र.३ हा नमुना आराखडा या पुढे ग्रामपंचायत कार्यालयाच्या नविन इमारत बांधकामासाठी उपयोगात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे. (आराखड्याची प्रत सोबत जोडली आहे.)

३. संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद यांनी या पुढे हाती घ्यावयाच्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या नविन इमारत बांधकामासाठी सदरहू नमुना आराखडा उपयोगात आणण्याच्या सूचना सर्व ग्रामपंचायतीना देण्याची व्यवस्था तात्काळ करावी.

४. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां.,मुंबई यांच्याकडील मंजुर नमुना आराखड्याची प्रत तांत्रिक विनिर्देशनासह या सोबत जोडण्यात आली असल्याने, त्यानुसार राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या नवीन ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामाकरीता काम निहाय सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन, त्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडून तांत्रिक मंजुरी घेण्याची कार्यवाही उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद यांनी त्वरेने करावी.

५. तसेच राजीव गांधी पंचायत सक्षमीकरण अभियानाअंतर्गत ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामाचा सदरहू आराखडा हा चालू दरसूचीनुसार रुपये १२.०० लक्ष ढोबळ अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेत तयार करण्यात आलेला असून, या योजनेअंतर्गत केंद्राचा ७५% हिस्सा जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याने, राज्य हिश्शाच्या २५% निधीची तरतूद जनसुविधा योजनेमधून उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद यांनी त्वरेने करावी.

६. या पुढे जन सुविधा योजनेतून ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकाम प्रस्तावित करताना, रुपये १२.०० लक्ष इतकी तरतूद अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी.

७. राजीव गांधी पंचयात सक्षमीकरण अभियान योजनेअंतर्गत सदरहू मंजुर नमुना आराखड्यानुसार एकुण ७७.९९ चौ.मी. (८३९.१७ चौ.फूट) क्षेत्रफळाचे बांधकाम ग्रामपंचायतीस उपलब्ध होणार आहे. सदर आराखड्यामध्ये जनसुविधा केंद्र, तलाठी/ पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक व सभागृह/ मिटींग हॉल इ. दालनांचा समावेश करण्यात आलेला असून, महिला व पुरुष प्रसाधनगृहाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे. जनतेला तलाठी, पोलीस-पाटील तसेच जनसुविधा केंद्राशी कागदपत्रांची देवाण-घेवाण करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने दर्शनी भागात खिडक्यांची व्यवस्था प्रस्तावित करण्यात आली आहे. सभागृहालगत भविष्यात जिन्याचे बांधकाम करण्याची सोय ठेवण्यात आली असल्याने, भविष्यातील दोन मजल्यांचे नियोजन विचारात घेवूनच संबधित अभियंत्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकात पायव्याच्या बांधकामाची व आर.सी.सी. बांधकामाची तरतूद करावी.

८. ज्या ग्रामपंचायतींनी संदर्भीय दिनांक २०.४.२०१२ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या आराखड्यानुसार ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम हाती घेतलेले आहे किंवा पूर्ण केलेले असेल, त्या ग्रामपंचायतींनी स्व: निधीतून आवश्यक अंतर्गत बदल करुन ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागामध्ये जनसुविधा केंद्र निर्माण करण्याची व्यवस्था करावी.

९. सदरहू मंजूर आराखड्यानुसार ज्या ठिकाणी ग्रामपंचायतीकडे पुरेशी जागा उपलब्ध नसेल, अशा ग्रामपंचायतीच्या ठिकाणी मंजूर आराखड्यात दर्शविण्यात आलेली दालने व सुविधा विचारात घेवून, जागेच्या प्रमाणात व मंजूर तरतूदीच्या मर्यादेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व त्यानुसार ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीचे बांधकाम घेण्याचे प्राधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

१०. मोठ्या ग्रामपंचायतीच्या ठिकाणी मंजूर आराखड्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाचे कार्यालयीन बांधकाम हाती घ्यावयाचे झाल्यास व त्यासाठी संबधित ग्रामपंचायतीने तरतूद उपलब्ध केल्यास, सदर तरतूदीच्या मर्यादेत संबधित ग्रामपंचायतीकरीता संबधित प्रादेशिक उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां.वि. यांच्याकडून आवश्यकतेनुसार आराखडा तयार करुन घेवून, त्यानुसार नवीन ग्रामपंचायत कार्यालयाचे इमारत बांधकाम हाती घेण्यास मुभा राहील.

११. सदरहू मंजुर नमुना आराखड्यानुसार हाती घेण्यात येणाऱ्या नविन ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामाचा दर्जा व कामाची गुणवत्ता विहीत मानकाप्रमाणे राखण्याची जबाबदारी संबधित उप अभियंता (बांधकाम) यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१२७१७२९३२०८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.


महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( चंद्रकांत ह. वडे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.


प्रत,

१) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
२) सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
५) सर्व सहसचिव/उप सचिव,ग्रा.वि.व ज.सं.वि.,बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई,
६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

७) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
८) सर्व जिल्हा परिषदांचे कार्यकारी अभियंता
९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
१०) सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी,
११) निवड नस्ती,कार्यासन क्र.पं.रा.७,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
१२) नियोजन विभाग (कार्या-मग्रारो-१), मंत्रालय, मुंबई
१३) सार्वजनिक बांधकाम विभाग (कार्या-इमा-३), मंत्रालय, मुंबई
१४) गृह विभाग( पो.पा.आस्था), मंत्रालय, मुंबई
१५) कृषी व प.दु.म.विभाग (१६अे), मंत्रालय, मुंबई
१६) ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व कार्यासने
१७) निवड नस्ती




SCHEMATIC SECTION @ A-A




GROUND FLOOR PLAN
TOTAL BUILT-UP AREA = 77.99 SQ.M

## DOOR AND WINDOW SCHEDULE

| DOOR | SIZE | DISCRIPTION |
|---|---|---|
| D | 1.2 X 2.1 | T.W. FRAME FULLY PANELLED DOUBLE SHUTTER DOOR. |
| D1 | 1.2 X 2.1 | T.W.FRAMED, DOUBLE SHUTTERED, SOLID CORE FLUSHDOOR AS PER DETAILS. |
| D2 | 0.9 X 2.1 | T.W.FRAMED, SINGLE SHUTTERED, SOLID CORE FLUSHDOOR AS PER DETAILS. |
| D3 | 0.8 X 2.1 | MARBLE FRAMED, WITH F.R.P. SINGLE SHUTTERED DOOR AS PER DETAILS. |
| WINDOW | SIZE | DISCRIPTION |
| W | 1.2 X 1.2 | T.W. FRAMED, FULLY GLAZED,DOUBLE SHUTTER WINDOW AS PER DETAILS. |
| W1 | 0.6 X 0.9 | T.W. FRAMED, FULLY GLAZED,LOUVERED WINDOW AS PER DETAILS. |

## BRIEF SPECIFICATION

| | | |
|---|---|---|
| STRUCTURE | | R.C.C FRAMED STRUCTURE. |
| FOUNDATION | | R.C.C FOUNDATION AS PER SOIL CONDITION |
| WALLS | a) EXTERNAL | 23 CM. THK. BRICK WALLS IN CEMENT MORTAR. |
| | b) INTERNAL | 15 CM. THK. BRICK WALLS / T.W. PARTITIONS AS SHOWN IN DRAWING. |
| PLASTER | a) EXTERNAL | SAND FACED CEMENT PLASTER. |
| | b) INTERNAL | CEMENT PLASTER WITH NEERU FINISH. |
| FLOORING | a) ENT. STEPS & ENT. LOBBY | POLISHED KOTAH. |
| | b) ALL ROOMS | POLISHED KOTAH. |
| | c) TOILET BLOCK , | ANTI SKID CERAMIC TILES . |
| | d) RAMP | CHECKERED CEMENT TILES. |
| SKIRTING | | HALF TILE SKIRTING AS PER FLOORING |
| DADO | a) TOILET BLOCK | CERAMIC TILES UP TO LINTEL LEVEL |
| DOORS | a) MAIN ENTRANCE | AS PER SCHEDULE. |
| | b)ALL ROOMS | AS PER SCHEDULE. |
| | c) TOILET | AS PER SCHEDULE. |
| WINDOWS & VENTILATORS | a) ALL ROOMS | AS PER SCHEDULE. |
| PAINTING | a) EXTERNAL | APEX PAINT. |
| | b) INTERNAL WALLS | OIL BOUND DISTEMPER OF APPROVED SHADE AND QUALITY. |
| | c) ALL CEILING | O.B.D. PAINT |
| | d) WOOD WORK & STEEL WORK | SYNTHETIC ENAMEL PAINT OF APPROVED SHADE AND QUALITY. |
| ROOF | | R.C.C SLAB WITH WATER PROOFING TREATMENT LAID TO SLOPE. |
| ELECTRICITY | | OPEN CONDUIT WIRING WITH P.V.C. CASING /CAPPING. |
| FIXTURES AND FASTENINGS | | IRON / BRASS / ALUMINIUM FIXTURES WHEREVER NECESSARY. |
| PLUMBING AND SANITATION | | ORISSA PAN WITH LOW LEVEL FLUSHING CISTERN. |
| WATER PROOFING | | INTEGRATED TYPE WATER PROOFING MATERIAL. |
| MISCELL-ANEOUS | a) OVERHEAD WATER STORAGE TANK | R.C.C / P.V.C. OVERHEAD WATER STORAGE TANK OF REQUIRED CAPACITY. |

AUTHORITY:

**THESE LINE PLANS ARE PREPARED ON THE BASIS OF INFORMATION RECEIVED FROM THE JT.SECRETARY,GRAMVIKAS VIBHAG, MUMBAI VIDE HIS LETTER NO.** क्र. ग्रापंई-२०११/प्र. क्र.९/ पंरा-७
**DATED : 7-1-2014**

NOTES:

ANY DISCREPANCY FOUND IN THIS DRAWING SHALL BE IMMEDIATELY BROUGHT TO THE NOTICE OF THE CHIEF ARCHITECT,M.S. P.W.D., MUMBAI PRIOR TO THE EXECUTION OF WORK.

ALL DIMENSIONS ARE IN METERS, EXCEPT WHEREVER MENTIONED BY UNITS.

ONLY WRITTEN DIMENSIONS ARE TO BE FOLLOWED.

OFFICE OF
THE CHIEF ARCHITECT,
MAHARASHTRA STATE,
P.W.D., MUMBAI.

B.M.SANKHE (CA / 90 / 12830 )
CHIEF ARCHITECT

P.S.BALIWANT (CA / 83 / 7574)
DY.CHIEF ARCHITECT

N.P. PRABHUNE ( CA / 92 / 15439 )
SR. ARCHITECT(I/C)

PROPOSED TYPE DESIGN FOR GRAMPANCHAYAT OFFICE. ( REVISED )

GROUND FLOOR PLAN , SECTION,DOOR AND WINDOW SCHEDULE AND BRIEF SPECIFICATION

| 1:100 | 15-1-2014 | Chakor K.B |
|---|---|---|
| SCALE | DATE | DEALT BY |

| T-ADM/5526 | 3 |
|---|---|
| JOB NO. | DRG. NO. |